# आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे पनवेलमध्ये विकासाचे महापर्व

## -आर.सी.घरत

पनवेल (प्रतिनिधी) शहराच्या विकासाबरोबरच प्रत्येक गावात मोठया प्रमाणात विकासकामे करण्याचे काम करून आमदार प्रशांत ठाकूर यांनी खऱ्या अर्थाने पनवेल विधानसभा मतदार संघात विकासाचे महापर्व आणले आहे, असे रोखठोक प्रतिपादन रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर.सी.घरत यांनी शिवकर येथे बुधवारी (दि.२३) केले.

पनवेल विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांचा स्थानिक विकासनिधी व मुख्यमंत्री जनसुविधा निधीतून पूर्ण झालेल्या शिवकर येथील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण, शिवकर तळेवाडी ते चिखले जोडरस्ता आणि शिवकर ग्रामपंचायत कार्यालयाची नविन इमारतीचे उदघाटन व लोकार्पण आर.सी.घरत यांच्या हस्ते व महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सदस्य अरूणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना आर.सी.घरत बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, आमदार प्रशांत ठाकूर नुसत्या घोषणा करीत नाहीत तर कामे पूर्ण करून दाखवतात, म्हणूनच संपूर्ण पनवेल विधानसभा मतदार संघात सर्वाधिक विकासकामे झाली आहेत. विकासकामे करत असताना विविध योजनांची अंमलबजावणी तसेच विविध लोककल्याणकारी निर्णय घेण्यासंसंदर्भात सतत पाठपुरावा करून त्या-त्या विषयातील प्रश्न ते मार्गी लावत असतात. पनवेलसाठी शेकडो रूपयांचा निधी आणून विकासाची गंगा अखंडपणे सुरू ठेवण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी करून राज्यात पनवेल विधानसभा मतदार संघाला विकासाच्याबाबतीत अग्रेसर केले आहे, असेही आर.सी.घरत म्हणाले. ज्याप्रमाणे शिवकरमधील विकासकामांना झुकते माप दिले, त्याचप्रमाणे आगामी विधानसभा निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रचंड मतांनी निवडून आणण्यासाठी मतांची आघाडी मिळवून द्यावी, असे आवाहनही त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले.

यावेळी रायगड जिल्हा परिषदेतील पक्षप्रतोद राजेंद्र पाटील यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेकडो कोटी रूपयांची विकासकामे करून पनवेलला विकासाचा चेहरा दिला आहे. पनवेल विधानसभा क्षेत्राचा विकासाचा ध्यास घेतलेले आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रत्येक गावामध्ये पायाभूत सुविधा मिळवून देण्याचे काम करतानाच विविध योजना राबविण्याचेही प्रामाणिक काम केले आहे. आमदार प्रशांत ठाकूर विकासात कधीही राजकारण आणत नाही, म्हणूनच त्यांच्याकडून विधायक कामे होत आहेत, असेही राजेंद्र पाटील यांनी सांगून काळुंद्रे विभागाचे अध्यक्ष अनेष ढवळे, कार्यकर्ते आणि सहकाऱ्यांचेही आपल्या भाषणातून त्यांनी कौतुक केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्र पाटील, इंटकाचे तालुकाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, पनवेल विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, मावळ लोकसभा युवा सरचिटणीस विक्रांत घरत, माजी नगरसेवक सिराज सय्यद, महिला कॉंग्रेसच्या तालुका कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर, काळुंद्रे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अनेष ढवळे, शिवकर ग्रामपंचायतीच्या सरपंच मिनाक्षी ढवळे, उपसरपंच तुकाराम टोपले, तालुका कॉंग्रेसचे सहचिटणीस दत्ता परदेशी, कृषि सेलचे तालुकाध्यक्ष गोविंद पाटील, भिंगार पंचायत समिती कॉंग्रेसचे विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, युवक कॉंग्रेसचे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष योगेश लहाने, युवा नेते आनंद ढवळे, गणेश घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते गोटीराम ढवळे, अशोक मुंडे, आंबो ढवळे, रामदास खेत्री, हिरामण पाटील, निलेश पवार, मारूती पाटील, माया पाटील, अनंता ढवळे, चंदर पाटील, मोहन पोपेटा, रामदास ढवळे, धर्मा तुपे, लक्ष्मण तुपे, नामदेव फडके, शंकर पाटील, तुकाराम तुपे, गोपीनाथ ढवळे, वामन ढवळे, परशुराम ढवळे, अरून पाटील, भरत चौधरी, झिपाशेठ पाटील, वंडू चौधरी, दत्तात्रेय ढवळे, जगदिश ढवळे, हरिश्चंद्र घरत, छोटू शेख, प्रदीप ढवळे, महेश पाटील, धरती ढवळे, मोहिनी पोपेटा, मनिषा ढवळे, प्रशांत पाटील, गुरूनाथ पाटील, राजकुमार ढवळे, यांच्यासह कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

**आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेहमीच राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे पक्षभेद न करता त्यांच्याकडून विकासकामे होत आहेत. शिवकर ग्रामपंचायतीसाठी नविन इमारतीची अत्यंत आवश्यकता होती. आमदार प्रशांत ठाकूर यांनी तात्काळ आमच्या मागणीचा विचार करून इमारतीसाठी तसेच विविध कामांसाठी निधी मिळवून दिला. त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांचे ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्यावतीने धन्यवाद मानतो.**

**- अनेष ढवळे, अध्यक्ष- काळुंद्रे जि.प.विभाग**